ISSN 2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# UNIVERSAL
## RESEARCH ANALYSIS

CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

Vol. I, Issue : VIII
UNIVERSAL RESEARCH ANALYSIS Half yearly Research Journal
ISSN 22
Mar. 2013 to Au

| Sr. No. | Title of Research Paper | Author | Page N |
|---|---|---|---|
| 14 | शाह तुराब कृत -`मनसमझावन` मे व्यक्त `दार्शनिकता` | डॉ. रजाक कासार | 80-82 |
| 15 | जनकवि नागार्जुन | डॉ. नीलांबिके एस. पाटील | 83-87 |
| 16 | कृषी विपणन व्यवस्थेमधील समस्या आणि उपाययोजना | डॉ. दिलीप एस. अर्जुने | 88-93 |
| 17 | आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचा आर्थिक व सामाजिक स्थितीचा आढावा विशेष संदर्भ विदर्भ विभाग (अमरावती) | प्रकाश भारसिंग सरसरे | 94-100 |
| 18 | भारतीय अर्थव्यवस्थेतील समांतर अर्थव्यवस्थेची चौकशी | डी. जी. चिघळीकर | 101-107 |
| 19 | भारतीय अर्थकारणांची डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी केलेल्या चिकित्सेचा समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. संध्या बीडकर | 108-111 |

Vol. I, Issue :VIII
URA UNIVERSAL RESEARCH ANALYSIS Half yearly Research Journal
ISSN 2229-4406
Mar. 2014 to Aug. 2014 

**19**

# भारतीय अर्थकारणांची डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी केलेल्या चिकित्सेचा समाजशास्त्रीय अभ्यास

*डॉ. संध्या बीडकर*
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
मिल्लिया महाविद्यालय,
बीड, जि. बीड

**Research Paper - Sociology**

अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, समाजसुधारक, पत्रकार, कायदेपंडित, तत्वज्ञ, लेखक असे अनेकरंगी व्यक्तीमत्व म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ! सामान्यांच्या आवाक्या पलीकडील दुरदृष्टी असलेल्या या विभूतिला पुढील १०० वर्षापलीकडील दिसत होते. या अर्थाने ते द्रष्ट्ये महापुरुष होते. आणि त्यांच्या या दृष्टीनेच त्यांनी जाती, धर्म, पंथ, समाज, वर्ग, वर्ण अशा अनेक तुकड्यांमध्ये विखुरलेल्या भारतीय समाजासाठी लोकशाहीचे अखंड महावस्त्र विणण्याचे अशक्य कोटीतील महानकार्य घटनानिर्मीतीद्वारे केले. सशक्तांनाच नव्हे तर अशक्तांनाही जगण्याची व्यवस्था निर्माण करण्याची व्यवस्था या महामानवाने निर्माण केली. गरीब / दरिद्री वर्गाने श्रीमंत वर्गाविरोधात बंड करु नये, लोकशाही धोक्यात येवू नये यासाठी धोरणात्मक बाबींची उपाययोजना त्यांनी घटनद्वारे केली. वर्णातून निर्माण झालेली जातीव्यवस्था भारतीय समाजरचनेचं व्यवच्छेदक लक्षण असल्याचे त्यांनी जाणले होते. एकवेळ एका जातीत जन्मलेली व्यक्ती मरेपर्यत त्याच जातीत रहात असलेल्या या समाजव्यवस्थेतील श्रमविभागणीदेखील जातीवर आधारीत होती. त्यामुळे ती अत्यंत टिकावू - चिरंतन अशा स्वरुपाची असल्याची त्यांना जाणीव होती. त्यांच्या अनेक ग्रंथांमधून विवेचन करतांना त्यांनी भारतीय अर्थकारणाचे मूळ जातीव्यवस्थेत असल्याचे सांगितले आहे. आपल्या महपरिनिर्वाणाच्या दोन वर्षे अगोदरच अनुयायांना उद्देशून केलेल्या भाषणात त्यांनी आपला संघर्ष संपत्ती व सत्ते साठी नसून मानवी कल्याणासाठी असल्याचे प्रतिपादन केले होते. ते म्हणतात Ours is a battle not for wealth or for power. It is a battle for freedom. It is a battle for the reclamation of human personality.१ एवढ्या व्यापक दृष्टीकोनातून त्यांनी प्रारंभ केलेल्या संघर्षलढ्याचे एक

कारण आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या भारतीय समाजरचनेच्या तळाशी असलेल्या वर्गाची दयनिय स्थिती हेदेखिल होते. त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

आपले वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी भट - पुरोहीत वर्गाने आपला शोषणाचा सिध्दांन्त शुद्रांच्या गळी मोठ्या युक्तीने उतरविल्याचे ते सांगतात. उच्चवर्णीयांनी आपल्या सामाजिक, आर्थिक सुरक्षिततेसाठी वर्णव्यवस्था मोडीत निघू नये म्हणून वर्णसंकर करणाऱ्या स्त्रियांवर बंधने आणल्याचे त्यांनी आपल्या 'भारतातील जाती, संरचना, उदय व विकास' या १९१७ मध्ये कोलंबिया विद्यापीठात सादर केलेल्या शोधनिबंधात सांगितले आहे. असा वर्णसंकर घडून आल्यास वर्णा-वर्णामध्ये सरमिसळ होवून ब्राम्हण-क्षत्रिय, वैश्य-शुद्र हा ढाचा नष्ट होईल. त्यामधील ब्राम्हणवर्णाचे वर्चस्व/सार्वभौमत्व नष्ट होईल. त्यांना महत्व उरणार नाही - एकाधिकार नष्ट होवून पुरोहीत वर्गाचे महत्व राहणार नसल्याचे प्रतिपादन त्यांनी प्रस्तुत निबंधात केले आहे. याच विचारधारेवर अर्थव्यवस्थेची मिमांसा पुढील काळात केलेली दिसून येते. तळाशी असलेल्या दलित समाजाचे आर्थिक हित जोपासण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. समाजातील खालच्या जातीतील दलित समाज आर्थिकदृष्ट्या कमजोर होता अशा स्थितीत गरजेपोटी त्याकाळात सावकारांसमोर हात पसरविल्याशिवाय त्यांना पर्याय नव्हता. सावकारांकडून त्याची लूट थांबविण्याच्या उद्देशाने त्यांनी तत्कालीन मुंबई राज्यात समाजजागृतीसाठी जाहिर सभा व संमेलनाद्वारे सावकार विरोधी मोहीम राबविली होती२. एक प्रकारे महाराष्ट्र शासनाने "कोपरापासून ढोपरापर्यन्त" सोलून काढण्याची भाषा वापरुन १९०६ साली आणलेल्या सावकार विरोधी कायद्याचे सुतोवाच त्यांनी ७५ वर्षापुर्वीच केले होते असे म्हणता येईल. म्हणजेच ते ७५ वर्षे काळाच्या पुढे असल्याचे म्हणावे लागेल. समाजातील आहेरे व नाहीरे वर्गातील संघर्ष टाळण्याचा त्यांचा हा स्तुत्य प्रयत्न होता.

श्रम करण्यासाठी अर्थ ही प्रेरणा असते म्हणजेच अर्थोत्पादन श्रमीक वर्गाला काम करण्यास उत्तेजन देणारा महत्वाचा घटक असतो. परंतु भारतीय समाजव्यवस्थेमध्ये धर्मसंस्थेने विशीष्ट जातींनाच श्रमाची कार्ये नेमून दिल्यामुळे ती प्रेरणाच मारल्याचे त्यांनी सांगितले.३ ज्यांना जे काम नेमून दिले तेच त्यांनी करावे त्या ढाच्याबाहेर कुणालाही पडता येणार नाही अशी येथिल व्यवस्था असल्यामुळे आर्थिक विकास खुंटल्याचे त्यांचे प्रतिपादन होते. येथिल विवाहप्रथा जातीसंस्थेवर आधारित असल्यामुळे ती टिकून राहीली या धर्मसंस्थेने पुनर्विवाहबंदी, केशवपन, बालविवाह इत्यादी प्रथा निर्माण केल्यामुळे स्त्री परावलंबी बनून आर्थिकदृष्ट्या पंगू बनल्याचे त्यांनी सांगितले अशा स्त्रियांना पुरुषवर्गाने आपल्या मर्जीप्रमाणे वागविले आणि मजबुरीने स्त्रियांनीही अशा स्थितीचा स्विकार केला. एकप्रकारे पुरुषवर्गाला स्त्रियांचे शोषण करण्याची यामुळे संधी मिळाल्याचे आणि स्त्रि कमजोर बनल्याचे त्यांनी मत मांडले एवढेच नव्हे तर हळुहळु ब्राम्हण पुरोहीतांनी शुद्र वर्णाचे अशाचप्रकारे आर्थिक शोषण केले कारण त्यांना वर्ण बदलण्यास बंदी होती आणि त्याशिवाय

श्रमव्यवस्था बदलने शक्य नव्हते. म्हणजेच शुद्रांनाही स्त्रियांप्रमाणेच आर्थिकदृष्ट्या पंगू बनविल्या गेल्याचे ते सांगतात. याचाच परिणाम देशाच्या विकासाच्या गतीवर झाला असे ते मानतात. कारण सामाजिक बदलाशिवाय आर्थिक विकास होवू शकत नाही हा अर्थशास्त्राचा नियम आहे. कोणत्याही अर्थव्यवस्थेचा विकास होत असतांना सामाजिक रचनेत बदल होत असतात. यासंदर्भात अर्थशास्त्रज्ञ प्रो. मायर व बाल्डविन यांचे मत उल्लेखनिय ठरते - ते म्हणतात "आर्थिक विकास ही एक अशी प्रक्रिया होय, की तिचेद्वारे एखाद्या अर्थव्यवस्थेच्या वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नात दिर्घकाळापर्यंत वाढ होते. जर विकासाचा दर हा लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा जास्त असेल तर दरडोई आर्थिक उत्पन्नात देखिल वाढ होईल".४ यामध्ये अपेक्षित असलेला सामाजिक बदल येथिल समाजरचनेत शक्य नव्हता कारण श्रम करणारा वर्ग एकाच जातीत बंदिस्त होता. म्हणून देशाच्या प्रगतीला देखिल खिळ बसल्याचे प्रतिपादन डॉ. आंबेडकरांनी केले आहे. अर्थविकासासाठी असा बदल की, जो उत्पादन वृध्दीला पोषक ठरतो तोच येथिल समाजव्यवस्थेने कुंठीत केल्याचा हा दृष्य परिणाम असल्याचा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. यासाठीच ही सामाजिक जडणघडण मोडीत काढण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केल्याचे दिसून येते. एक वेळ एका जातीत जन्म झाला की त्याच स्थितीत तोच व्यवसाय करीत संबंधितास आयुष्य जगावे लागत असल्याकारणाने त्याची क्षमता दुसऱ्या व्यवसायास अनुकूल असेल किंवा त्याला दुसऱ्या व्यवसायाची आवड असेल तरी त्याला ते जातीव्यवस्थेने बंदिस्त केल्या कारणाने बदलने शक्य नव्हते. केवळ धर्मसंस्थेने ठरविल्यानुसार उच्चवर्णीयांची सेवा करण्याचाच व्यवसाय करणे खालच्या जातीतील लोकांना भाग असल्यामुळे त्याची मजुरी/मोबदला श्रमावर आधारित नसून वरिष्ठांच्या मर्जीवर अवलंबून असतो. यातूनच कमजोर लोकांचे शोषण केल्या जाते. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात "भारतामध्ये हिंदूनी चातुर्वर्ण्य सिध्दान्ताद्वारे जेवढे शोषण केले तेवढे कुणीच केले नाही. आर्थिक परिवर्तन घडून येण्यासाठी डॉ. आंबेडकर पुरोहीत संस्था नष्ट करण्याचा सल्ला देतात".५

उपरोक्त विवेचनावरुन त्यांनी भारतीय अर्थव्यवस्था अप्रगत राहण्यामागे येथिल जातीय विषमता हे एक कारण असल्याचे प्रतिपादन केल्याचे दिसून येते. त्यामुळे उच्चवर्ग खालच्या वर्गाचे शोषण करण्याचा एकाधिकार बाळगून असल्याकारणाने श्रमिक असलेल्या तळातील वर्गाची श्रमकरण्यामागील प्रेरणा लोप पावणे स्वाभाविक असल्याचे ते मानतात. म्हणजेच अर्थव्यवस्था माघारण्यामागे त्यांनी सामाजिक व्यवस्थेला दोष दिला आहे. आणि त्यासाठी सामाजिक दृष्ट्या समाज समान पातळीवर आणण्याचा उपाय त्यांनी सुचविला आहे. जगात इतरत्र कुठेही अस्तीत्वात नसलेल्या येथिल जातीव्यवस्थेचे मूळ समूळ उखडून टाकणे अर्थकारणाच्या दृष्टीने उपकारक ठरणार असल्याचे त्यांचे प्रतिपादन आहे.

## संदर्भ सूची

१. Dr. shashi. S.S Ambedkar and Social Justice, vol. II, Director publication Division, Ministry of Information and Broadcasting, Govt of India, Dilhi ०१ March १९९२ p. ३९

२ .पगडी, सेतू माधवराव - गॅजेटियर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, अमरावती डिस्ट्रिक्ट, रिवाइज्ड एडिशन पृ. ६३७

३. Moon, vasant (Compiled Dr. Babasaheb Ambedkar Writing and Speeches, Vol-I, Govt. of Maharashtra, १९८९ p.०९

४. झामरे, देव-भारतीय अर्थशास्त्र, पिंपळापुरे प्रकाशन, नागपुर १९९९ आवृत्ती ५ पृ. २५

५. Moon, vasant (Compiled Dr. Babasaheb Ambedkar Writing and Speeches, Vol-I, Govt. of Maharashtra, १९८९ p.०९

Milliya Arts Science & Mang.
Science College,Beed.